सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १२८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ३० जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## ठाकरे गटाला मुंबईत सर्वात मोठा झटका

## आमदार सचिन अहिर यांना शिंदे गटाकडून विधान परिषद उपसभापतीपदाची उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० मुंबई–** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांना धक्का दिला आहे. उद्धवसेनेचे आमदार सचिन अहिर यांनी शिंदेसेनेकडून उपसभापती पदासाठी अर्ज भरला आहे. शिंदेंच्या या धक्कातंत्राने उद्धवसेनेला धक्का बसला आहे. विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीत सचिन अहिर यांच्या उमेदवारीने अनेकांच्या भूवया उंचावल्या.



विधिमंडळाच्या अधिवेशनात विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी निवडणूक होत आहे. या पदासाठी शिंदेसेनेकडून नीलम गोऱ्हे, कृपाल तुमाने यांची नावे समोर आली होती. परंतु ऐनवेळी उद्धवसेनेचे आमदार सचिन अहिर यांनी महायुतीकडून उमेदवारी अर्ज भरला आहे. सचिन अहिर हे वरळी विभागातील आमदार होते. आदित्य ठाकरे पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवणार होते तेव्हा सचिन अहिर यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर अहिर यांना विधान परिषदेची आमदारकी देण्यात आली होती. सचिन अहिर यांच्या निमित्ताने मुंबईत उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे.

याबाबत मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, सचिन अहिर हे शिवसेनेचे आमदार होते, ते शिवसेनेत आलेत. उपसभापतीपदासाठी आम्ही शिवसैनिकाला न्याय दिला आहे. त्यांच्या मतदारसंघात कुणीतरी अतिक्रमण केले होते असा टोला त्यांनी आदित्य ठाकरे यांना लगावला. तर सर्व कायदेशीर प्रक्रिया पडताळून सचिन अहिर यांनी उपसभापतीपदासाठी अर्ज भरला आहे अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली.

## जाणाऱ्यांना शिव्या देण्यापेक्षा आत्मचिंतन करा, आम्ही तोडकाम नाही जोडकाम करतो

### एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०मुंबई–** मागील आठवड्यात शिवसेना ठाकरे गटातून सहा खासदारांनी बंडखोरी करत शिंदे गटात प्रवेश केला. आता ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसला आहे, आज विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटाकडून अर्ज दाखल केला. अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम ठोकला, त्यांनी आज शिंदे गटात प्रवेश केला. दरम्यान, पत्रकार परिषद घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.



शब्दाला किंमत देणारी ही संघटना आहे. त्यामुळे लोक स्वतहून पक्षात येत आहे. राज्यात सहा खासदारांनी सोबत येण्याचा निर्णय घेतला. खासदार म्हणजे २० -२५ लाख लोकांमधून निवडून येणारा लोकप्रतिनिधी असतो. आपण का शिवसेनेत येतो हे प्रत्येकाने सांगितलं. जनतेला आणि मतदारसंघाला न्याय दिला पाहिजे. त्यांचे प्रश्न सोडवले पाहिजे आणि नेत्याने संकट काळात उभे राहिले पाहिजे ही माफक भावना असते. त्यामुळेच सर्व लोक येत आहेत, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.एकनाथ शिंदे म्हणाले, गोकुळ गीते यांनीही निवडून आल्यावर सहयोगी सदस्य म्हणून काम सुरू केले आहे. कोणत्याही प्रकारचे आम्ही तोडकाम करत नाही. जोडकाम करतो. आम्ही तोडायला नाही जोडायला आलो आहे. काही लोक तुडवायला आले. आम्ही शिवसेना वाढवायला आलो आहे. आमचा अजेंडा खुर्ची नाही, असा टोलाही एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

## माउलींच्या रथाला आधुनिक तंत्रज्ञानाची साथ

### आषाढी वारीसाठी नवा चांदीचा रथ सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ३०आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी यंदा परंपरेला आधुनिकतेची जोड देत एक देखणा आणि वैशिष्ट्यपूर्ण रथ साकारण्यात येत आहे. आळंदीजवळील चिंबळी येथे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा नवीन रथ तयार केला जात असून, यामुळे माउलींचा पालखी सोहळा अधिक सुलभ आणि सुरक्षित होणार आहे. सुमारे दीड टन वजनाचा हा रथ वजनाने अत्यंत हलका असून, भाविकांना दर्शनासाठी अधिक सोयीचा ठरेल, अशी माहिती देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी दिली आहे.



यापूर्वीचा चांदीचा रथ तब्बल अडीच टन वजनाचा असल्याने तो ओढताना बैलांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. हीच अडचण लक्षात घेऊन नव्या रथाचे वजन थेट एक टनाने कमी करण्यात आले असून, त्याची उंचीही काही प्रमाणात घटवण्यात आली आहे. डीआरडीआेच्या मार्गदर्शनाखाली आणि अष्टेकर ज्वेलर्सच्या सहकार्याने या रथावर सिल्व्हर इलेक्ट्रोप्लेटिंगचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. रथाची बॅटरी काढल्याने आणि त्यात अत्याधुनिक बेअरिंग-कपलिंगचा वापर केल्याने रथाची चाल कमालीची सुलभ झाली आहे. सुमारे २० ते २५ लाख रुपये खर्चून तयार केलेला हा रथ भाविक स्वतः किंवा बैल आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने अगदी सहजपणे ओढू शकणार आहेत. वारीपूर्वी या रथाची प्रत्यक्ष चाचणी घेतली जाणार आहे.

या नव्या रथाची रचना अत्यंत कलाकुसरयुक्त आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. रथाच्या वरील बाजूचे स्ट्रक्चर फायबरचे असून, सिल्व्हर इलेक्ट्रोप्लेटिंग करून रथाला एक वेगळीच चकाकी आणली जात आहे. रथावर आठ खांब उभे केले असून, त्यावर चांदीचे आकर्षक नक्षीकाम कायम ठेवण्यात आले आहे. सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा बदल म्हणजे या रथावर आठ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. रथावर गरुड आणि हनुमान यांचे विलोभनीय शिल्प साकारण्यात आले असून, रथाच्या अग्रभागी माउलींच्या मूर्तीसह सूर्य, गरुड, हनुमान आणि जय-विजय यांच्या सुंदर प्रतिकृती विराजमान असतील. आगामी ८ जुलै रोजी होणाऱ्या प्रस्थान सोहळ्यापूर्वी हा देखणा, सुरक्षित आणि तंत्रज्ञानयुक्त रथ माउलींच्या चरणी आणि भाविकांच्या सेवेत दाखल होणार आहे.

## आता रोज आरत्या करू का? फरक पडत नसल्याचे सांगत आदित्य ठाकरेंनी अहिरांच्या घरातील पदे मोजली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई–** आठ दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटातील सहा खासदारांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. चार वर्षांमध्ये पुन्हा त्याच दिवशी शिंदेंच्या शिवसेनेने ठाकरे गटाला मोठा धक्का दिला. ज्यानंतर ठाकरेंनी फुटलेल्या सहा खासदारांच्या मतदारसंघात जाऊन त्यांच्याविरोधात मोठा हल्लाबोल केला.



परंतु, शिंदेंच्या या धक्क्यातून ठाकरे सावरत नाही तेच आता पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाला आणखी मोठा धक्का एकनाथ शिंदेंनी दिला आहे. एकीकडे पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेच्या उपसभापतीच्या निवडणुकीची चर्चा रंगलेली असताना याच निवडणुकीच्या माध्यमातून शिंदेंनी ठाकरेंना धक्का देत ठाकरे गटातील विधान परिषदेतील आमदार सचिन अहिर यांना गळाला लावले आहे. याच मोठ्या घडामोडीविरोधात आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार तथा युवानेते यांची प्रतिक्रिया समोर आली आहे.आमदार सचिन अहिर यांनी साथ सोडल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी विधान भवन येथून प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, गेले चार वर्षे आम्ही पाहतोय की, ज्यांना सगळं काही मिळत आहे ते स्वत:च्या स्वार्थासाठी निघून जात आहेत. हे आम्ही गेल्या काही काळापासून पाहत आहे, आमचे तिकडचे काम बोलते, त्यामुळे कोणी येण्याने किंवा जाण्याने धक्का काही बसत नाही. मात्र एकच दुर्दैवाच आहे की ज्यांना आम्ही सगळं काही दिले, त्यांना अजून काय पाहिजे? ते असही नाही म्हणू शकत की आदित्य ठाकरे भेटतच नाहीत. ते स्वत: आमदार आहेत, त्यांच्या मुलीला प्रभाग समिती दिलेली आहे. आमदार सेनेत पद आहे, शिवसेनेत उपनेतेपद आहे. अजून तुम्हाला काय पाहिजे असा प्रश्न पडत आहे? आम्ही यांना काही कमी दिलेले नाही, आम्ही रोज तुमच्या आरत्या करायच्या का?

## भाजप शहराध्यक्ष नितीन गुडघे पाटील यांच्या नियुक्तीला स्थगिती

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.३०अमरावती**अमरावती भाजपच्या शहराध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती झालेल्या नितीन गुडघे पाटील यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली आहे.



भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज ३० जून २०२६ रोजी स्थगितीचे पत्र जारी केले. २९ जून रोजी झालेल्या नियुक्तीला तत्काळ स्थगिती देण्यात आल्याचे पत्रात नमूद असून, याची नोंद घ्यावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अमरावती भाजपच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून शहराध्यक्षपदाबाबतची अनिश्चितता कायम राहिली आहे.

## शाळेच्या बसवर मोठे झाड कोसळले, १२ विद्यार्थी जखमी, एका विद्यार्थ्याचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० मुंबई–** मुंबईच्या चेंबूर येथून मोठी बातमी समोर येत आहे. चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळल्याची घटना घडली आहे. संबंधित घटना ही चेंबूरमधील ११ नंबर रोडवर घडली आहे. घटना घडली तेव्हा बसमध्ये शाळकरी मुले होती. या दुर्घटनेत १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. घटनेनंतर मुलांचे रेस्क्यू करुन गाडीतून बाहेर काढण्यात आलं. पण तरीही एक मुलगा गाडीतच अडकल्याची माहिती आहे. त्याला गाडीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न शर्थीने सुरु आहेत. पण भलंमोठं वृक्ष बसवर कोसळल्याने बसची अवस्थादेखील वाईट झाली आहे. बसचं वरचं छत खालच्या दिशेला दबलं गेल्याने या मुलाच्या बचावकार्यात अडथला येत असल्याची माहिती मिळत आहे. सध्या बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु आहे.



प्राथमिक माहितीनुसार, या बसमध्ये एकूण १३ शाळकरी मुलं होती. एका नामांकित शाळेची ही बस होती. बस चेंबूरच्या ११ नंबर रोडवरुन जात असताना अचानक भलं मोठं झाड हे या बसवर उन्मळून पडले. या घटनेत बसमधील १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाले. यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. सर्व जखमी मुलांना जवळील खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. तर एक मुलगा हा बसमध्ये अडकला आहे. या मुलाला बाहेर काढण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.


घटनेनंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी मोठ्या संख्येने दाखल झाले. पोलिसांना या घटनेची तातडीने माहिती देण्यात आली. परिसरातील नागरिकांनी शक्य होईल तशी मदतीला सुरुवात केली. यानंतर अग्निशमक दलाचे कर्मचारी, महापालिकेचे कर्मचारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सर्वांकडून मुलांना बाहेर काढण्याचं काम आधी करण्यात आलं. त्यानंतर त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांकडून प्रशासनावर संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी आता कुणावर कारवाई होते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## आरटीई प्रवेशाची चौथी निवड यादी जाहीर

### राज्यातील ९ हजार ९३८ रिक्त जागांसाठी ३ जुलैपर्यंत प्रवेशाची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०पुणे :–** शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेतील चौथी निवड यादी जाहीर करण्यात आली आहे. या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २५ जून ते ३ जुलै २०२६ या दरम्यान संबंधित शाळेत प्रवेश निश्चित करण्याची मुदत देण्यात आली आहे. राज्यभरात अद्याप ९ हजार ९३८ जागा रिक्त




असल्याने प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे.

यंदा आरटीई प्रवेशासाठी राज्यभरातून २ लाख ८९ हजार २८६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १ लाख ५ हजार ८११ विद्यार्थ्यांची निवड यादी जाहीर करण्यात आली होती, तर ८६ हजार ३४ विद्यार्थ्यांचा प्रतीक्षा यादीत समावेश करण्यात आला होता.

नियमित प्रवेश फेरीत ७९ हजार ७७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली. पहिल्या प्रतीक्षा फेरीत १२ हजार ९१० विद्यार्थ्यांची निवड झाली, तर दुसऱ्या प्रतीक्षा फेरीत ३ हजार २९७ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आले.

## उद्धवजींच्या सदिच्छा २०१९ मध्येच मिळाल्या असत्या तर आज चित्र वेगळे असते; देवेंद्र फडणवीस यांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०पालघर:** – राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा काल पालघर या ठिकाणी पाहणी दौरा होता यादरम्यान पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना उत्तरे देताना फडणवीस यांनी एकाच विमानातून उद्धव ठाकरे आणि त्यांनी प्रवास केलेल्या प्रश्नाबाबत अनेक खुलासे केले. यावेळी आपण पंतप्रधान पदाचे दावेदार ठरणार असून यामुळे फडणवीस यांचे पंख छाटले जात असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. असा प्रश्न पत्रकारांनी फडणवीस यांना विचारला.

यावर उत्तर देताना फडणवीस यांनी सांगितले की मी माणूस असून मला पंख नाहीत आणि दुसरा मुद्दा यातून ठाकरे हे मला



सदिच्छा देत आहेत मात्र अशा सदिच्छा त्यांनी २०१९ मध्ये दिल्या असत्या तर आज चित्र वेगळे असतं असा देखील टोला त्यांनी ठाकरे यांना लगावला.

पुढे पत्रकारांनी असेही विचारले की तुमच्या चेहऱ्यावर हतबलता असल्याचे देखील उद्धव ठाकरे यांनी सांगितले होते त्यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की मी प्रवासात अनेकदा काही डाऊनलोड केलेले व्हिडिओ ओटीटी वरील वेब सिरीज मी पाहत असतो त्यामुळे त्या संपूर्ण प्रवासात माझं लक्ष मोबाईल मध्ये होतं. अशावेळी ठाकरेंना माझ्या चेहऱ्यावरची हतबलता कशी काय दिसली हा ही प्रश्नच आहे असंही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पुढे फडणवीस म्हणाले की हे असे राजकीय प्रश्न माझ्यासाठी गौण असून अशा प्रश्नांनी कोणाचं भलं होणार नाही.यामुळे मी अशा राजकीय प्रश्नांना महत्त्व न देता कामावर अधिक लक्ष केंद्रित करतो याशिवाय राज्यातील १४ कोटी लोकांचा आशीर्वाद माझ्यासोबत असल्याने मला काहीही होणार नाही असे यावेळी फडणवीस यांनी सांगितले.

## संपादकीय ......

# आत्मचिंतनापेक्षा आगपाखड मोठी!

*शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला पुन्हा एकदा खिंडार पडल्यामुळे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. ठाकरेंच्या पक्षातून नुकतेच सहा खासदार बाहेर पडले आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. आता खासदार बाहेर पडल्यानंतर असाच प्रकार या पक्षाच्या आमदार आणि अगदी नगरसेवकांपर्यंतही पोहोचू शकतो की काय, अशी शक्यता दबक्या आवाजात व्यक्त होऊ लागली आहे. त्यामुळे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जे खासदार फुटले आहेत, त्यांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन तिथल्या कार्यकर्त्यांना बळ देण्याचा प्रयत्न केला. पक्षाला मोठी गळती लागलेली असल्यामुळे ती रोखण्यासाठी धडपड करणे हे पक्षप्रमुख या नात्याने त्यांचे कामच आहेत. यांनी सुरू केलेल्या या डॅमेज कंट्रोलसोबतच त्यांनी भाजपला डॅमेज करण्याचा डाव रचलेला दिसतोय. कारण तीन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकाच विमानातून प्रवास करण्याचा योग आला. त्याविषयी आपल्या भाषणामधून उद्धव ठाकरे म्हणाले, या विमानभेटीत देवेंद्र फडणवीस हे आपल्याला हतबल झालेले दिसले. त्यांचे पंख कापण्याचे प्रयत्न केंद्रातून सुरू आहेत. त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा एकनाथ शिंदे यांना बळ देत आहेत. त्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांना कमजोर करण्यात येत आहे. त्यामुळे आपल्या पक्षातून सहा खासदार फुटले ते भाजपमध्ये न जाता शिंदे यांच्या पक्षात गेले. एक गोष्ट खरी आहे की, खासदार शिंदे यांच्या पक्षात हे खासदार आल्यामुळे महाराष्ट्रात खासदारांच्या बाबतीत शिंदेंचे बळ वाढले आहे. खासदार हे आमदारांवर प्रभाव टाकत असतात. आमदार पुढे नगरसेवक, पुढे सरपंच अशी ही निधी मिळण्याची उतरंड असते. त्यामुळे कुठल्याही पक्षाच्या दृष्टीने खासदारांची संख्या वाढणे महत्त्वाचे असते. त्यामुळे संसदेत पक्षाचे वजन आणि प्रभाव वाढतो. शिंदेंच्या पक्षात ठाकरे यांच्याकडील सहा खासदार आल्याने शिंदेंचा संसदेतील प्रभावही नक्कीच वाढला आहे. भाजपचे सध्या ९ खासदार आहेत, तर शिंदे यांच्या शिवसेनेचे आता १३ खासदार झाले आहेत.*

*उद्धव ठाकरे यांच्यासमोर पक्षाला लागलेली ही गळती थांबविण्याचे मोठे आव्हान आहे. त्यांचा पक्ष सोडणार्या या सहा खासदारांचे असे म्हणणे आहे की, आम्ही आमच्या मतदारसंघांच्या विकासासाठी शिंदेंच्या पक्षात प्रवेश केला आहे. दिवंगत अजित पवार यांनीसुद्धा काकांच्या मूळ पक्षात बंड करून भाजप आणि शिंदे यांच्या महायुतीशी हातमिळवणी केली तेव्हा लोकांच्या विकासासाठी मी हा निर्णय घेतला आहे, असे सांगितले होते. अर्थात, आजवर ज्यांनी मूळ पक्षातून बंड करून सत्ताधारी पक्षासोबत आले त्यांनी जनतेच्या विकासाचेच कारण दिले आहे. म्हणजे आम्ही जे काही बरेवाईट करतो ते जनतेच्या हितासाठीच असते, असे आपल्याकडील राजकीय नेत्यांचे म्हणणे असते. आज जे उद्धव ठाकरे सत्तेसाठी निष्ठाहीन झालेल्या आपल्या पक्षातील फुटिरांवर आगपाखड करत आहेत, ते २०१९ साली स्वत: घेतलेला निर्णय कसे काय विसरतात? खरे तर त्यांच्या पक्षाची आज जी अभूतपूर्व पडझड झालेली आहे, त्याला त्यांचा तोच निर्णय कारणीभूत होता याचे त्यांना सोयीस्कर विस्मरण होत आहे. त्यांना त्यावेळी मुख्यमंत्रीपद हवे होते, पण भाजप त्यांना द्यायला तयार नव्हता, कारण भाजपच्या आमदारांचे संख्याबळ जास्त होते. त्यामुळे त्यांनी आपण बाळासाहेबांना शिवसेनेचा मुख्यमंत्री बनवण्याचे वचन दिले होते हा मुद्दा काढला. खरे तर त्या अगोदर मनोहर जोशी आणि नारायण राणे शिवसेनेचे मुख्यमंत्री होऊन गेलेले होते. त्यामुळे शिवसेनेचा काही पहिल्यांदाच मुख्यमंत्री बनणार नव्हता. पण शेवटी कुठलाही राजकीय नेता असला तरी त्याच्यासाठी सत्ता महत्त्वाची असते. त्यात पुन्हा ठाकरेंना मुख्यमंत्रीपदाचे आकर्षण. त्यांची ही इच्छा भाजप पूर्ण करायला तयार नसल्यामुळे त्यांनी त्यांचे वैचारिक विरोधक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीशी हातमिळवणी केली आणि मुख्यमंत्रीपद मिळवले.*

*उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या हातातोंडाशी आलेली सत्ता घालवून त्यांना धडा शिकवला. मी परत येईन हा देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास मोडीत काढला. त्यातून त्यांना मानसिक समाधानही मिळाले, पण हे मुख्यमंत्रीपद मिळवताना त्यांनी राजकीय विश्वासार्हता गमावली. त्याचे परिणाम त्यांना आता भोगावे लागत आहेत. कारण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी उभी हयात ज्या शरद पवार आणि काँग्रेसशी राजकीय आणि वैचारिक विरोधक म्हणून लढा दिला, त्याच पक्षांसोबत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी केलेली हातमिळवणी हा त्यांनी स्वत:च्या पक्षावर घातलेला मोठा घाव होता. कारण शिवसेना आणि भाजपची विचारसरणी ही मिळतीजुळती होती, तर शिवसेनेचे नव्याने मित्र झालेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीची विचारसरणी पूर्णपणे विरोधी होती. त्यामुळे खासदार, आमदार, कनिष्ठ पातळीवरील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यामध्ये प्रचंड वैचारिक गोंधळ निर्माण झाला. या गोंधळानेच शिवसेनेचा पाया डळमळीत केला. जर आपले पक्षप्रमुख आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी आपली वैचारिक निष्ठा सोडत असतील, तर आम्ही तरी का म्हणून एकनिष्ठ रहायचे ही वृत्ती वाढू लागली. जर उद्धव ठाकरे यांनी ती चूक केली नसती तर फुटिरांना दोष देण्याचा नैतिक अधिकार त्यांना राहिला असता. आज ते फुटलेल्या खासदारांच्या नावाने आगपाखड करत आहेत. पण स्वत: त्यांनी २०१९ साली आपली सोयच पाहिली होती. तेव्हा आपल्या पक्षाच्या खासदार, आमदारांना काय वाटेल याचा विचार त्यांनी केला नव्हता. याविषयीचे आत्मचिंतन करायला उद्धव ठाकरे तयार आहेत का? की देवेंद्र फडणवीसांना खिजविण्यात ते धन्यता मानणार आहेत? कारण नुकसान फडणवीसांचे नाही ठाकरेंचे होत आहे.*

# ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ ही शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई–** मुंबई : ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ ही केवळ स्पर्धा नसून महाराष्ट्रातील शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास हेच त्याचे सर्वात मोठे यश आहे. आजचे १८ हजार शेतकरी गट पुढील काळात ५० लाख शेतकऱ्यांना एकत्र आणतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वर्षा निवासस्थानी पानी फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित ‘फार्मर कप २०२६’च्या शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, पाणी फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान, अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यावेळी उपस्थित होते. झूम लिंकद्वारे राज्यातील शेतकरी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी स्मार्ट शेती पचे लोकार्पण



करण्यात आले. कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी २६ ऑगस्ट २०२५ पासून राज्यभरात ४६ तालुक्यात सुरू असलेल्या फार्मर कपच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली.मुख्यमंत्री म्हणाले की, या ‘सत्यमेव जयते फार्मर कप २०२६’ या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वासच भविष्यातील कृषी परिवर्तनाचा पाया ठरेल. फार्मर कपमधील १८ हजार शेतकरी गट हे महाराष्ट्रातील शेती क्रांतीचे शिल्पकार ठरणार आहेत, त्यांच्या अनुभवातून लाखो शेतकरी प्रेरणा घेतील. विधानमंडळात महिला शेतकरी विधेयक मंजूर करण्यात येणार आहे. शेतीच्या मालकीमध्ये नाव नसलेल्या महिलांनाही अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता दिली जाणार आहे. मागील वर्षी फार्मर कपमध्ये सहभागी झालेल्या गटांमध्ये सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांच्या उत्पादनात सरासरी ७१ टक्क्यांनी वाढ झाली. सामूहिक खरेदीमुळे कृषी निविष्ठांवर १,५८४ कोटी रुपयांची बचत झाली, तर सामूहिक श्रमांमुळे एकरी सुमारे ६ हजार रुपयांची मजुरीची बचत झाली. गटशेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, फार्मर कपमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकरी गटांच्या गावांना स्वतः भेट देणार आहेत. शेतीचा विकास हे राज्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असले तरी शासन, पाणी फाऊंडेशन, कृषी विभाग आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे काम केल्यास पुढील पाच ते सात वर्षांत महाराष्ट्रातील शेती क्षेत्रामध्ये ऐतिहासिक परिवर्तन घडवून आणता येईल. प्रत्येक सहभागी शेतकरी हा आधीच विजेता असून, ही चळवळ राज्यातील कृषी समृद्धीचा नवा अध्याय ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# आमदार पोहोचले शेतकऱ्यांच्या बांधावर

## धानोरापूर्णा शेतशिवारातील पेरणीपूर्व समस्यांची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धानोरापूर्णा**
’मन की बात’ कार्यक्रमानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी धानोरापूर्णा परिसरातील शेतशिवाराची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ उपाययोजनांचे निर्देश दिले. धानोरापूर्णा येथे रविवारी झालेल्या ’मन की बात’ कार्यक्रमानंतर आमदार तायडे यांनी धानोरापूर्णा, कोतगावंडी, दहिगाव व शहापूर परिसरातील शेतशिवाराला भेट दिली. नरेश बर्वे व मुकुंद टेकाडे यांच्या शेतात शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी पाणंद रस्ते, शिवरस्ते, बोगस बियाणे आदी समस्यांची माहिती घेतली. तसेच पुरेसा पाऊस



झाल्यानंतरच पेरणी करण्याचा सल्लाही त्यांनी शेतकऱ्यांना दिला. यावेळी शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवासह विविध अडचणी मांडल्या. त्यावर आमदार तायडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देत प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना कोणतीही अडचण आल्यास थेट संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, शेतभेटीदरम्यान पावसाला सुरवात झाल्याने शेतकरी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी नरेश बर्वे, रावसाहेब लव्हाळे, माधव अवघड, आशिष मेहत्रे, प्रशांत धवे, श्याम गावंडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# पथ्रोट येथे कॉटन बियाण्यांची अंडरकटिंगने होताहे विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पथ्रोट–** मका व तूर लागवडीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल असल्याने यंदा कॉटन बियाण्यांची मागणी घटली आहे. परिणामी कंपन्यांना एमआरपीपेक्षा कमी दरात अंडरकटिंग करून विक्री करावी लागत आहे. मागील वर्षी चढ्या भावाने विक्री झालेल्या कॉटन बियाण्यांची यंदा सुरवातीपासूनच मागणी कमी असल्याचे चित्र आहे. पहाडी भागातील शेतकरी मका, तर पायथ्याच्या भागातील शेतकरी तूर पिकाला प्राधान्य देत असल्याने या दोन्ही पिकांच्या बियाण्यांच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे कृषी सेवा केंद्रांवर कॉटन बियाण्यांचा साठा मोठ्या प्रमाणात शिल्लक असून एमआरपीपेक्षा कमी दरात त्यांची



विक्री सुरू आहे. शेतकऱ्यांच्या मते, कपाशीच्या तुलनेत तूर व मका पिकांवर मजुरी, फवारणी, निगा आणि काढणीचा खर्च कमी येतो. शिवाय तुरीला शासनाचा हमीभाव तसेच स्थानिक बाजारपेठेतही चांगला दर मिळत असल्याने या पिकाकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला आहे. मागील वर्षी ब्लॅक मार्केटमध्ये १, ६०० रुपयांपर्यंत विक्री झालेल्या काही कॉटन बियाण्यांचे पाकीट यंदा सुमारे ८५० रुपयांत विकले जात असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. जंगली प्राण्यांच्या वाढत्या उपद्रवाचाही पीक निवडीवर परिणाम होत आहे. तूर, उडीद व मूग पिकाचे डुक्कर, हरिण व रोहींकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना झटका मशीन, तार कुंपण यांसारख्या सुरक्षाव्यवस्थेवर अतिरिक्त खर्च करावा लागतो. याउलट मका पिकाला तुलनेने कमी नुकसान होत असल्याने अनेक शेतकरी मका लागवडीला प्राधान्य देत आहेत. परिणामी पहाडी भागात ज्वारीच्या क्षेत्रातही घट होत असल्याचे चित्र आहे. मका व तुरीच्या तुलनेत यंदा कॉटन बियाण्यांच्या विक्रीत मोठी घट झाली आहे. त्यामुळे कंपन्यांनी अंडरकटिंग सुरू केली. तथापि विक्री वाढविण्यासाठी कृषी सेवा केंद्रांवरही दबाव येत असल्याचे मत एका कृषी सेवा केंद्र चालकाने व्यक्त केले.

# ग्रामपंचायतीची अतिक्रमणांवर धडक कारवाई कांडली मार्ग मोकळा

## पोलीस बंदोबस्तात दिवसभर मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०परतवाडा :**
कांडली मार्ग तसेच लगतच्या खाजगी भूखंडावर अनेक वर्षांपासून करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर ग्रामपंचायत प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात धडक कारवाई करत परिसर अतिक्रमणमुक्त केला. यावेळी अनेक छोट्या व्यावसायिकांनी प्रशासनाच्या कारवाईपूर्वीच स्वतःहून आपली अतिक्रमणे हटविल्याने कारवाई शांततेत पार पडली. कांडली मार्गावरील सार्वजनिक जागा तसेच खाजगी भूखंडावर काही छोट्या व्यावसायिकांनी अनधिकृतपणे अतिक्रमण करून व्यवसाय सुरू ठेवला होता. त्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत होते, तसेच परिसराचे नियोजनही विस्कळीत होत होते.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने संबंधित अतिक्रमणधारकांना यापूर्वीच नोटिसा देऊन अतिक्रमणे स्वतःहून हटविण्याच्या सूचना



दिल्या होत्या. सूचनेची मुदत संपल्यानंतर ग्रामपंचायत प्रशासनाचे अधिकारी जेसीबीसह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस बंदोबस्तात सकाळपासूनच अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू करण्यात आली. कारवाईची गंभीरता लक्षात घेऊन अनेक व्यावसायिकांनी कोणताही वाद न घालता स्वतःहूनच आपली अतिक्रमणे काढून घेतली. उर्वरित अतिक्रमणे जेसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आली.या कारवाईमुळे कांडली मार्ग मोकळा झाला असून वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. भविष्यात सार्वजनिक रस्ते व इतर जागांवर अनधिकृत अतिक्रमण केल्यास अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा ग्रामपंचायत प्रशासनाने दिला आहे. या कारवाईदरम्यान विस्तार अधिकारी ईश्वरदास सातंगे, ग्रामपंचायत अधिकारी विनोद मोरे, प्रशासकीय मंडळाचे सदस्य तसेच मोठा पोलीस बंदोबस्त उपस्थित होता. संपूर्ण कारवाई शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

# दुर्गम भागात ‘आनंद ज्योती फाउंडेशन’तर्फे १० शाळांमधील २३१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व न्यूट्रिशन किटचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव**
अमरावती जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र टाकरखेडा मोरे येथील सिद्धेश्वर संत गुलाब बाबा यांचा जन्मभूमीतले दोन रत्न अक्षय दादा कळमकार प्रणव दादा सोनटक्के तीन–चार वर्षापासून लगातार हे कार्य करत आहेत यांच्या कार्याचे कौतुक महाराष्ट्रभर होत आहे

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही ’आनंद ज्योती फाउंडेशन’च्या वतीने पुणे शहरापासून साधारण ७० किलोमीटर अंतरावर असलेल्या वेल्हे तालुक्यातील पासली आणि परिसरातील इतर अत्यंत दुर्गम पहाडी भागातील गरजू शालेय विद्यार्थ्यांना शालेय व जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. पुणे जिल्ह्यात दिनांक १५ जून पासून शाळा सुरू झाल्या. १९ आणि २० जून रोजी हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. मागील ६ वर्षांपासून फाउंडेशनच्या वतीने हा शैक्षणिक यज्ञ नित्यनियमाने सुरू आहे.या उपक्रमांतर्गत दुर्गम भागातील चिमुरड्यांना शैक्षणिक साहित्याचे ’शालेय किट’ देण्यात आले. यामध्ये वह्या, रजिस्टर, पेन, पेन्सिल, चित्रकला पुस्तक (ड्रॉइंग बुक), रंगीत पेन्सिल यांसह पावसाळ्यासाठी छत्री, कपडे आणि मुलांच्या आरोग्यासाठी ’न्यूट्रिशन किट’चे



वाटप करण्यात आले. तसेच प्राथमिक शिक्षणासोबतच मुलांच्या आनंदासाठी पासली आणि वरोती येथील अंगणवाड्यांमधील लहान मुलांना खेळणीसुद्धा देण्यात आली.

**पायपीट करत पोहोचवले साहित्य–** हा परिसर भौगोलिकदृष्ट्या अत्यंत दुर्गम आणि डोंगराळ आहे. काही ठिकाणी वाहने जाण्यासाठी रस्ताही उपलब्ध नाही. मात्र, या परिस्थितीवर मात करत, केवळ विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे या ध्येयाने ’आनंद ज्योती फाउंडेशन’च्या टीमने अनेक किलोमीटरची पायपीट करत साहित्य थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले. आनंद ज्योती फाउंडेशनचे संस्थापक प्रणव सोनटक्के यांचा या संपूर्ण मोहिमेच्या नियोजनामध्ये महत्त्वाचा वाटा होता, तर सह–संस्थापक अक्षय कळमकार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्यक्ष जमिनीवर उतरून या मोहिमेची अंमलबजावणी केली.

२३१ विद्यार्थी आणि १० शाळांना मदतया दोन दिवसीय मोहिमेत एकूण १० शाळा आणि अंगणवाड्यांना भेटी देऊन २३१ विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने खालील गावांचा समावेश होता. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी फाउंडेशनचे सह–संस्थापक अक्षय कळमकर यांच्यासह नीलेश चोपडे, शिरीष जाधव, स्वप्नील कोलाखे, धनंजय मुसळे, शिवांश मुसळे, गौरव दोशी, पराग वाणी आणि प्रोफेसर दिलीप चौधरी सर यांनी विशेष परिश्रम घेतले व ते प्रत्यक्ष उपस्थित होते. फाउंडेशनच्या या निरंतर सामाजिक कार्याचे वेल्हे परिसरातील ग्रामस्थांकडून, शिक्षकांकडून आणि पालकांकडून भरभरून कौतुक होत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# बडनेरा रेल्वेस्थानकावर होणार सरकता जिना

## रेल्वे प्रशासनाची महत्त्वपूर्ण बैठक डॉ. अनिल बोंडे यांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

बडनेरा रेल्वेस्थानकावर सरकत्या पायऱ्यांचा जिना (एस्केलेटर) होणार असून चांगापूर येथे भुयारी मार्ग होणार आहे. सोमवारी रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यात राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी याबाबतचा सविस्तर आढावा घेतला.

येथील जिल्हा जनसंपर्क कार्यालयात राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या उपस्थितीत भुसावळ रेल्वे विभाग आणि रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत अमरावती जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या आणि प्रलंबित विकासकामांवर सविस्तर चर्चा करून ते प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिले.

या बैठकीत प्रामुख्याने चांगापूर रेल्वे भुयारी मार्गाच्या समस्येवर कायमस्वरूपी तांत्रिक तोडगा काढण्याबाबत आणि तेथील लाईट व्यवस्था सुधारण्याबाबत प्राधान्याने चर्चा करण्यात आली. पावसाळ्यात किंवा इतर वेळी निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून नागरिकांना दिलासा देण्याच्या सूचना यावेळी डॉ. बोंडे यांनी दिल्या. भुसावळ ते चांदूर बाजार दरम्यान सुरू असलेल्या 'अमृत भारत रेल्वेस्थानक' योजनेच्या कामांच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. यासोबतच बडनेरा रेल्वेस्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी एस्केलेटर (सरकते जिने) बसवणे, स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील अतिक्रमण तत्काळ हटवून रस्त्याचे काम गतीने पूर्ण करणे आणि अकोली स्टेशनवर रात्रीच्या वेळी प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याबाबत रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीला भुसावळ रेल्वे विभागाचे वरिष्ठ डीसीएम तपस्वी, विभागीय अभियंता पंचम, महारेलचे विभागीय अभियंता हुसेन, बडनेराचे सहायक अभियंता राणे, वरिष्ठ डीईए शुक्ला, झेडआरयुसीसी सदस्य रविकिरण वाघमारे व रमेश वऱ्हाडे, सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर भार्गव, मुख्य सचिव सुनील सोमवंशी, ऋषिकेश दुर्गे यांच्यासह रेल्वे व संबंधित विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील २ लाखांवर शेतकरी कर्जमुक्त

## कर्ज भरणाऱ्या ९३ हजार शेतकऱ्यांना लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना राज्य शासनाने जाहीर केली आहे. यात जिल्ह्यातील १२ प्रमुख बँकांमधील २ लाख २ हजार थकित कर्जदार आणि ९३ हजार नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्यात आली असून, या कर्जमाफीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. जिल्ह्यातील १२ प्रमुख बँकांतर्गत एकूण २ लाख २ हजार १६७ शेतकऱ्यांची खाती या योजनेत २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी पात्र ठरली आहेत. यातील रक्कम सुमारे २३३८ कोटी रुपये होणार आहे. तसेच वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या ९३ हजार १३९ शेतकरी खात्यांना ५० हजार रुपयांपर्यंतच्या प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार आहे.

त्यासाठी ५२४ कोटी रुपये कळविण्यात आले आहे. बँकनिहाय आकडेवारीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अंतर्गत सर्वाधिक ७१ हजार ६५५ खात्यांची ७०० कोटी रुपयांची रक्कम कळविण्यात आली आहे. त्या खालोखाल स्टेट बँक ऑफ इंडियातील ४१ हजार १३५ खात्यांच्या ५१३ कोटी रुपयांची रक्कम आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या २९ हजार ९८० खात्यांना ४८८ कोटी रुपये कर्जमाफीची रक्कम



कळविण्यात आली आहे. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे २९ हजार १० शेतकऱ्यांचे २९८ कोटी, बँक ऑफ बडोदाचे ३ हजार १०२ शेतकऱ्यांचे ४७ कोटी, बँक ऑफ इंडियाचे ७ हजार १८३ शेतकऱ्यांचे ८० कोटी, युनियन बँक ऑफ इंडियाचे ६ हजार १७० शेतकऱ्यांचे ७६ कोटी, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे २ हजार ८३ शेतकऱ्यांचे २९ कोटी, युको बँकेचे ५१८ शेतकऱ्यांचे ५ कोटी, पंजाब नॅशनल बँकेचे २ हजार १८२ शेतकऱ्यांचे ८ कोटी, कॅनरा बँकेचे १ हजार ९०२ शेतकऱ्यांचे ९ कोटी आणि इंडियन बँकेच्या ७ हजार २४७ शेतकऱ्यांच्या ८२ कोटी रुपयांच्या कर्जमाफीची रक्कम जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे कळविण्यात आली आहे. कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने केली जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. सर्व बँकांना हा गोळा केलेला डेटा पोर्टलवर तातडीने अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे ही रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू होईल.

# अकोल्यात भरधाव दुचाकीची चिमुकल्याला भीषण धडक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अकोला**

अकोला शहरातील एका निवासी वसाहतीमध्ये भरधाव वेगाने येणाऱ्या एका दुचाकीने रस्त्यावरून जाणाऱ्या एका चिमुकल्याला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीच्या धडकेने मुलगा हवेत उडून रस्त्यावर जाऊन पडला. या अपघातात चिमुकला गंभीर जखमी झाला असून हा अंगावर काटा आणणारा संपूर्ण थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

हा भीषण अपघात घडताच आजूबाजूला असलेल्या नागरिकांनी तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात



पडलेल्या त्या चिमुकल्याला स्थानिकांनी अत्यंत तत्परतेने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. सध्या या बालकावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे.-

# अमरावती जिल्हा परिषद कर्मचारी वसाहतीत निकृष्ट दर्जाचे बांधकाम

## पावसाळा सुरू होताच क्वार्टर्सला लागली गळती; रस्ते उखडले,नाल्या तुंबल्याने वसाहतीला नरकयातना

**विदर्भा प्रजासत्ताक दि.३० अमरावती** अमरावती जिल्हा परिषदेच्या वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांना समस्यांचा मोठा विळखा पडला असून, प्रशासकीय अनास्थेचा आणखी एक धक्कादायक नमुना समोर आला आहे. अवघ्या चार-पाच महिन्यांपूर्वीच या वसाहतीमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून दुरुस्ती व देखभालीची कामे करण्यात आली होती. मात्र, पहिल्याच पावसात हे संपूर्ण काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप येथील कर्मचाऱ्यांच्या पत्नी व गृहिणींनी केला आहे.सध्या



वसाहतीमधील रस्ते पूर्णपणे उखडले असून, बसवलेले पेव्हर ब्लॉक बाहेर निघाले आहेत. इतकेच नव्हे तर, निकृष्ट कामामुळे पहिल्याच पावसाचे पाणी क्वार्टर्समध्ये गळत आहे. कॉलनीमध्ये लहान पाईपलाईनमुळे पिण्याचे पाणी येत नाही, अंधाराचे साम्राज्य असूनही पुरेसे स्ट्रीट लाईट्स नाहीत आणि अंतर्गत नाल्या तुंबल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. वसाहतीची ही दुरवस्था दूर करून प्रशासनाने तात्काळ मूलभूत सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनी केली आहे..

# स्मार्ट मीटर सक्ती विरोधात शिवसेनेची महावितरण कार्यालयावर धडक

## स्मार्ट मीटर बसवण्यास सक्ती केल्यास परिणाम भोगावे लागणार

**विदर्भा प्रजासत्ताक दि.३० नांदगाव खंडेश्वर**

शहरासह तालुक्यातील घरगुती ग्राहकांना स्मार्ट मीटर लादण्याच्या सक्तीचा तीव्र निषेध करत विज वितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयावर धडक देऊन स्मार्ट मीटर लावण्यास जबरदस्ती केल्यास परिणाम भोगावे लागतील असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी निवेदन सादर करून दिला. राज्य शासनाने जून २०२४ मध्ये घरगुती ग्राहकांसाठी स्मार्ट मीटरची अंमलबजावणी स्थगित केली होती असे असताना शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून विज वितरण कंपनीचे कर्मचारी खाजगी कंत्राटदार कडून ग्राहकांना सोबत जबरि करून मीटर बसवित आहे वास्तविक ग्राहकांला लेखी पुर्वसुचना देणे आणि त्यांची संमत्ती घेऊनच स्मार्ट मिटर बसविण्याचे आदेश असताना हुकूमशाही पध्दतीने स्मार्ट मिटर बसविणे सुरु आहे. स्मार्ट मिटरमुळे वीज वापराचे अचूक मोजमाप होत असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात



असला तरी अनेक ग्राहकांनी अचानक वाढलेल्या वीज बिलांवर आक्षेप घेतला आहे बिल कमी करून घेण्यासाठी नागरिकांना वारंवार महावितरण कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहे त्यामुळे स्मार्ट मीटर डोकेदुखी ठरत आहे स्मार्ट मीटरची सक्ती केल्यास परिणाम भोगावे लागले असा इशारा देत उपकार्यकारी अभियंता श्याम येनगंठिवार यांना घेराव करून शिवसेनेने निवेदन सादर केले यावेळी न.पं. चे गटनेते प्रकाश मारोटकर बाळासाहेब राणे विष्णू तिरमारे कृ.उ.बा.स. उपसभापती विलास पाटील सावदे संचालक प्रमोद ठाकरे डॉ. अरुण बेलसरे मधुकर कोठाडे दिलीप देवतळे निलेश इखार रवी ठाकूर गोपाल बनकर प्रकाश ब्राह्मणवाडे नितीन दुधे सुनील गुरमुळे गुणवंत चांदुरकर महिलाआघाडी:- छाया भारती रमाकांत मुरादे लोकेश उडबगले अक्षय राणे अक्षय काकडे लीलाधर चौधरी भागवत लाहे मनोज ढोके चेतन धवणे रवी दांडगे दिलीप ब्राम्हणवाडे हरिदास लिचडे शेख महेताब बाळा सुने सुनिल थोरवे सतीश मोरे अक्षय तुपटकर आकाश लोमटे पंकज ठाकरे नयन कापडे आवेज भावेश भांबूरकर दिनेश रघुते विजय पेटले सुरज सोळंके सूरज लोमटे अरुण कापडे विजय सुने अनिल मारोटकर अक्षय हिवराळे भूमेश्वर गोरे प्रेम हिवराळे यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते

# 'त्या' गावांना गुरुकुंज उपसा सिंचन योजनेत घ्या

## आ. राजेश वानखडे यांची विधानसभेत आग्रही मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.अमरावती-** तिवसा तालुक्यातील गुरुकुंज उपसा सिंचन योजनेच्या पहिल्या टप्प्यातून वंचित राहिलेल्या १२ गावातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाचा लाभ मिळावा, यासाठी गुरुकुंज वाढीव उपसा सिंचन योजनेला तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी आमदार राजेश वानखडे यांनी केली.

पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे त्यांनी विधानसभेत ही मागणी केली. सिंचनापासून अनेक वर्षे वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी शासनाचे लक्ष वेधत त्वरित निर्णय घेण्याची मागणी केली. तिवसा तालुक्यातील वऱ्हा सर्कलमधील वऱ्हा, जावरा, मालधुर, सालोरा, धोत्रा, माळेगाव, शेंदोळा, शिरजगावसह परिसरातील एकूण १२ गावे आजही सिंचन सुविधेपासून वंचित आहेत. या गावांना अप्पर वर्धा प्रकल्पाच्या कालव्यावर आधारित वाढीव उपसा सिंचन योजना अथवा स्वतंत्र उपसा सिंचन योजना मंजूर करून पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार वानखडे सातत्याने शासनाकडे करत आहेत.



यापूर्वी १८ फेब्रुवारी २०२५ रोजी जलसंपदा मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रानुसार या १२ गावांचा अप्पर वर्धा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समावेश करण्यासाठी सर्वेक्षण प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार प्रादेशिक जलसंपदा कार्यालयामार्फत सर्वेक्षणासाठी निविदा प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली. मात्र, शासनाकडून ही गावे वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पात समाविष्ट करण्याचा विचार असल्याचे कळविण्यात आले. यावर आक्षेप घेत आमदार वानखडे यांनी विधानसभेत स्पष्ट केले की, वैनगंगा-नळगंगा नदीजोड हा अत्यंत मोठा प्रकल्प असून तो टप्प्याटप्प्याने पूर्ण होणार आहे. त्यामुळे संबंधित १२ गावांचा दुसऱ्या किंवा तिसऱ्या टप्प्यात समावेश होण्याची शक्यता असून, प्रत्यक्ष सिंचनासाठी किमान १५ वर्षांचा कालावधी लागू शकतो. तोपर्यंत येथील शेतकरी पाण्याविना शेती करण्यास बाध्य राहतील. आ. वानखडे यांनी सांगितले की, अप्पर वर्धा प्रकल्पात सध्या ९.३९ दशलक्ष घनमीटर पाण्याची बचत होत आहे. गुरुकुंज उपसा सिंचन योजना राबविल्यास शेतकऱ्यांना अल्पावधीत सिंचनाचा लाभ मिळू शकतो. त्यामुळे या गावांचा अप्पर वर्धा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समावेश करून सर्वेक्षण पूर्ण करत वाढीव उपसा सिंचन योजनेस तातडीने प्रशासकीय मंजुरी द्यावी, अशी त्यांनी आग्रही मागणी केली.

# जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यात १३७ शाळा जर्जर तर २३० वर्गखोल्या धोकादायक यादीमध्ये

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती** शिक्षण विभागाने बऱ्यापैकी गाजावाजा करीत मंगळवारी ३० जून रोजी निवडक शाळांमध्ये प्रवेशोत्सवाचे समारंभ आयोजित केले आहेत. परंतु व्यापक प्रमाणातील वास्तविक चित्र मात्र काही वेगळेच आहे. ग्रामीण तसेच शहरी भागांतील अनेक शासकीय आणि जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती अत्यंत नादुरुस्त व जर्जर अवस्थेत पोहोचल्या आहेत. अनेक ठिकाणी वर्गांची छते गळत असून, भिंतींना मोठे तडे गेले आहेत. जिल्ह्यात अशा १३७ शाळा असून त्यातील २३० वर्गखोल्या





निर्लेखनाच्या उंबरठ्यावर पोहोचल्या आहेत. यामुळे हजारो विद्यार्थ्यांची सुरक्षा आता गंभीर झाली असून, पालक आणि शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.मेळघाट याबाबत सर्वाधिक दुर्लक्षित राहिलेला भाग आहे. मेळघाटमध्ये धारणी व चिखलदरा असे दोन तालुके आहेत. या दोन तालुक्यांसह जिल्ह्यातील सर्व १४ तालुके मिळून जिल्ह्यात एकूण १५४९ शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या तपासणीदरम्यान यापैकी ४६३ शाळांची दुरुस्ती यावर्षी करावयाची होती. त्यासाठी ११ कोटी ८८ लाख ९० हजार रुपयांचा प्रस्तावही तयार करण्यात आला. परंतु उन्हाळ्याची सुटी संपून शाळेचे नवीन सत्र सुरु होण्याचा दिवस तोंडावर आला तरी जिल्हा परिषदेच्या शिक्षण व बांधकाम विभागाकडे याबाबतची नेमकी माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे आजघडीला जिल्ह्यातील किती शाळांची दुरुस्ती पूर्णत्वास गेली आणि किती शाळांची दुरुस्ती अद्याप सुरु आहे, हे कळायला मार्ग नाही. उर्वरित,पान.४ समूह साधन केंद्राची दुर्दशा : मेळघाटमधील एका गावच्या शाळेत समूह साधन केंद्र अर्थात केंद्रप्रमुख ज्याठिकाणचे आहे ती शाळा. नाव अजूनही गायबच : जिल्हा मुख्यालय असलेल्या अमरावतीला अगदी खेटून असलेल्या भातकुलीची ही शाळा. जिल्हा परिषदेने यावर्षी सुमारे १३ कोटी रुपये खर्चाचा नव्या वर्गखोल्यांच्या बांधकामाचा प्रस्ताव तयार केला होता. १०८ शाळांमध्ये १२५ नव्या वर्गखोल्या या रकमेतून बांधल्या जाणार होत्या. परंतु जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प पाहिल्यास मार्च २०२६ अखेर एक छदामही खर्च झालेला नाही. सध्या या कामासाठीची प्रशासकीय मान्यता देण्याचे काम सुरु असल्याचे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

# गुजराती एज्युकेशन सोसायटी निवडणूक: प्रोग्रेसिव्ह पॅनल विजयी

## निलेश लाठिया अध्यक्ष, डॉ. नितीन सेठ उपाध्यक्षपदी निवड



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**विदर्भातील नामांकित 'गुजराती एज्युकेशन सोसायटी'च्या संचालक मंडळाची निवडणूक रविवारी पार पडली. या चुरशीच्या निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह पॅनलने ८ जागा जिंकत आपले वर्चस्व सिद्ध केले. संस्थेच्या अध्यक्षपदी प्रोग्रेसिव्ह पॅनलचे सीए निलेश लाठिया विजयी झाले, तर उपाध्यक्षपदाची जबाबदारी समर्पण पॅनलचे डॉ. नितीन सेठ यांच्याकडे आली. समर्पण पॅनलला ६ जागांवर समाधान मानावे लागले.

रविवारी दुपारी ३.३० पर्यंत मतदान आटोपल्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता मतमोजणी सुरू झाली, जी उशिरा रात्रीपर्यंत चालली. एकूण ३९० मतदारांपैकी ३२७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीदरम्यान २७ मते अवैध ठरली. निवडणूक निर्णय अधिकारी हितेंद्र धाबलिया यांच्या देखरेखीखाली ही संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली.अध्यक्षपदासाठी विजयी झालेले सीए निलेश लाठिया यांना १७१ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार आणि माजी अध्यक्ष दिलीप पोपट यांना १४३ मतांवर थांबावे लागले.

अध्यक्ष आणि उपाध्यक्षांसह कार्यकारिणीच्या इतर १२ संचालकांसाठीही रविवारीच मतदान झाले. यामध्ये प्रोग्रेसिव्ह पॅनलचे भरत भायानी, ड. निलेश शाह, योगेंद्र देसाई, तुषार श्रॉफ, जितेंद्र दोशी, चेतन लाठिया आणि मुकेश गगलानी हे सात उमेदवार विजयी झाले. समर्पण पॅनलमधून दिनेश सेठिया, किशोर कारिया, सीमेश श्रॉफ, अमृत पटेल आणि सीए राजेश पटेल यांचा समावेश आहे.या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी हितेंद्र धाबलिया यांना रमेश कामदार, राजेंद्र पारेख, राजेंद्र मालवीया, तुषार पटेल, जितेंद्र आनंदपरा आणि हरीश संतोषिया यांनी सहकार्य केले.

संचालकपदाच्या १२ व्या जागेसाठी प्रोग्रेसिव्ह पॅनलचे मुकेश गगलानी अवघ्या ३ मतांनी विजयी झाले होते. या निकालावर पराभूत उमेदवार हर्षद उपाध्याय यांनी आक्षेप घेत पुनर्मतमोजणीची मागणी केली. निवडणूक अधिकाऱ्यांनी ही मागणी मान्य करत पुन्हा मतमोजणी केली, मात्र त्यात कोणतीही चूक आढळली नाही. त्यानंतर मुकेश गगलानी यांचा विजय घोषित करण्यात आला.

# पावसाळ्यातही चांदूर रेल्वे शहरात पाणीटंचाई; काही भागात टँकरने पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चांदूर रेल्वे-** एकीकडे पावसाळ्याने जोर धरला असताना, दुसरीकडे चांदूर रेल्वे शहरातील अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. शहरातील काही परिसरात मागील आठ ते दहा दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा झाला नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.माहितीनुसार, शहराच्या पाणीपुरवठा योजनेतील दोन्ही मोटारी बंद पडल्याने संपूर्ण यंत्रणा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे अनेक भागांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा ठप्प झाला असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. दरम्यान, पाणीपुरवठा पूर्णपणे बंद होण्यापूर्वी काही भागांमध्ये गढूळ आणि दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

अशा पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात असून, नगरपरिषद प्रशासनाने पाणीपुरवठ्याची



गुणवत्ता तपासून शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नगरपरिषदेकडून ज्या भागात मागिल काही दिवसांपासून पाणी पोहोचलेले नाही, त्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, ही व्यवस्था अपुरी ठरत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नगर परिषदेचा ढिसाळ कारभार; नागरिकांना शुद्ध पाणी द्यावे - नगरसेविका प्रियंका वरठे

चांदूर रेल्वे नगर परिषदेच्या ढिसाळ कारभारामुळे शहरात पाणीटंचाईची समस्या गंभीर झाली आहे. माझ्या प्रभागातही अनियमित पाणीपुरवठा झालेला आहे. त्यामुळे माझ्या प्रभागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. नळातून गढूळ पाणीपुरवठा होत असून, यावरून नगर परिषदेचा हलगर्जीपणा स्पष्ट होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ न करता नगर परिषद प्रशासनाने तातडीने सुरळीत व शुद्ध पाण्याचा नियमित पुरवठा करावा.

# शाळेचा पहिला दिवस, कुठे गुलाबपुष्प तर कुठे ढोल पथक वाजवून विद्यार्थ्यांचे स्वागत









**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

उन्हाळ्याची मोठी सुट्टी संपल्यानंतर राज्यभरातील शाळा आजपासून पुन्हा सुरु झाल्या आहेत. नवीन इयत्ता, नवे शिक्षक आणि पालकांना सोडून पुन्हा शाळेत जाताना चिमुरडे हमसून हमसून रडत आहेत.

तर माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यां आवडीने शाळेत पोहचले त्याच वेळी दीर्घ सुट्टीनंतर जुन्या मित्रांची पुन्हा भेट झाल्यामुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला आहे. अमरावती जिल्ह्यातील बहुतांश शाळा प्रशासनाकडून गुलाब पुष्प देऊन आणि ढोलताशे वाजवून विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आले मुलांना शाळा ही घरासारखी वाटावी आणि शाळेतला पहिला दिवस त्यांच्या कायमस्वरुपी आठवणीत राहावा, म्हणून अमरावती जिल्ह्यातील वेगवेगळ्या शाळा वेगवेगळ्या पद्धतीने मुलांचे स्वागत करतात.

अमरावती जिल्ह्यात तब्बल २८७१ शाळा आहेत व या सर्व शाळेत आजपासून विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरु झाला आहे.

**गुलाबपुष्प व भेटवस्तू:**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन व काही ठिकाणी औक्षण करून स्वागत केले. अनेक शाळांमध्ये मुलांना चॉकलेट्स आणि खाऊचे वाटपही केले जाते.

**शैक्षणिक साहित्याचे वाटप:**

स्वागतासोबतच इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले

### इयत्ता ३, ४ व ६ च्या मुलांना 'सेतू' अभ्यास

शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्या २१ कार्यदिवसांमध्ये सेतू अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाचे मूल्यमापन आणि उजळणी यावर भर असेल. भाषा, गणित आणि मूलभूत कौशल्यांच्या बळकटीकरणासाठी विशेष उपक्रम घेतले जातील. इयत्ता तिसरी, चौथी, सहावीच्या विद्यार्थ्यांना हा सेतू अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल व त्यानंतरच नियमित अभ्यासक्रमाला सुरुवात होणार आहे. या इयत्तेच्या विद्यार्थ्यांना नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तकेसुद्धा मिळणार आहेत. सोबत इयत्ता दुसरीची पुस्तकेसुद्धा बदलण्यात आली आहेत.

# जमिनीवर उतरले लाल नक्षत्र!

## पावसाचे शुभसूचक मानल्या जाणाऱ्या 'मृग किड्यांचे' विलोभनीय दर्शन

### ग्रामस्थांकडून हळदीकुंकू वाहून पूजा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अकोला–** ऋतू बदलाची चाहूल निसर्गातील परिवर्तनातून लागते. पाऊस पडताच शुष्क झालेली धरती हिरवा शालू ओढून नटते. पावसाच्या प्रमाणाचे द्योतक मृग किड्यांच्या दिसण्यावरून ठरत असते. दुर्मीळ व नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या मृग किड्यांचे विलोभनीय दर्शन अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील ग्रामीण भागात होत आहे. पाऊस चांगला पडल्याचे हे शुभसूचक आहे.

**जमिनीवर लाल नक्षत्रच उतरल्याचा भास**

पावसाळा सुरू झाला की विविध प्रकारचे कीटक निसर्गाच्या सानिध्यात दिसायला लागतात. लालभडक मृग किड्यांचे सर्वांनाच विशेष आकर्षण असते. आता त्याचे दिसणे दुर्मीळ ठरत आहे. पातूर शहराच्या अगोदर हनुमान मंदिराजवळ खडकाळ परिसरात ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक दीपक जोशी व डॉ. अतुल मुंदडा यांना निसर्गभ्रमंती दरम्यान मृग किड्यांचे अस्तित्व दिसून आले. गेल्या काही दिवसांत पडलेल्या पावसामुळे लहानमोठे मृग किडे तुरतुर फिरतांना दिसले. या किड्यांना पाहून आकाशातील लाल नक्षत्रच जमिनीवर उतरल्याचा भास होतो. त्यांची हालचाल सुरू असतांना काळ्या मातीला कुंकुमतिलक लावल्या सारखे विलोभनीय दृश्य दिसते. काही किडे भुसभुशीत जमिनीत छोटे बिळ करतांना दिसले. बहुतांश किडे एकमेकांचा पाठलाग करीत असल्याचे निरीक्षण पर्यावरणप्रेमींनी नोंदवले.

**'माईट' कुळात समावेश; पक्षी खातांना दिसत नाही**

मृग किडे सहा पायांच्या कीटक गटातले आहेत. सहा पायांच्या कीटकांच्या समूहाला 'इन्सेक्टा' किंवा 'षट्पाद' म्हटले जाते. 'माईट' कुळात त्यांचा समावेश होतो. पावसाळ्यात अनेक प्रकारचे कीटक निर्माण होतात. पक्ष्यांसाठी हे कीटक म्हणजे आयती मेजवानी असते. मात्र, मृग किड्यांना कोणी पक्षी खातांना दिसत नाही, अशी माहिती ज्येष्ठ पक्षीमित्र दीपक जोशी यांनी दिली.

नक्षत्रांचे नाव धारण केलेला हा लाल मखमली कीडा पावसाचा संदेश देणारा शेतकऱ्यांचा मित्र म्हणून परिचित आहे. परिणामी, त्याला कीडा न संबोधता मृग नक्षत्रातील देवदूत म्हणून देखील संबोधले जाते. बाल्यावस्थेत असतांना वाळवीची अंडी हेच त्याचे खाद्य असते. पूर्णवाढ झाल्यावर केवळ पाण्यावरच हा अल्प काळ जगतो, असेही दीपक जोशी यांनी सांगितले.

# अग्निसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करा नाहीतर कारवाईला सामोरे जा

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड नाही – महापालिका आयुक्त वर्षा लड्ढा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती–** शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी आहे. फायर ऑडिट ही केवळ औपचारिकता नसून ती विद्यार्थ्यांच्या जीविताच्या संरक्षणाशी निगडित अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड केल्या जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश महापालिका आयुक्त वर्षा लड्ढा यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील सर्व कोचिंग क्लासेसमध्ये अग्निसुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने महापालिका आयुक्त वर्षा लड्ढा यांनी मनपात शहरातील विविध कोचिंग क्लासेसच्या संचालकांची महत्त्वपूर्ण बैठक घेतली. बैठकीत अग्निसुरक्षा नियमांचे पालन, फायर ऑडिटची आवश्यकता, आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना तसेच विद्यार्थ्यांच्या जीवित सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्व कोचिंग क्लासेसनी आपल्या इमारतींमध्ये अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवणे, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग स्पष्टपणे दर्शविणे, विद्युत यंत्रणेची नियमित तपासणी करणे, आग लागल्यास तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध ठेवणे तसेच कर्मचारी व विद्यार्थ्यांना वेळोवेळी अग्निसुरक्षेचे प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याच्या सूचना देण्यात आल्या. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी फायर ऑडिट करताना तपासण्यात येणाऱ्या निकषांची माहिती देत इमारतींची रचना, विद्युत सुरक्षा, अग्निशामक



यंत्रांची उपलब्धता व कार्यस्थिती, पाण्याची व्यवस्था, आपत्कालीन जिने, सूचना फलक आणि बचाव व्यवस्थेची माहिती उपस्थितांना दिली. फायर ऑडिटमध्ये आढळणाऱ्या त्रुटी निश्चित कालावधीत दूर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. बैठकीत अनेक कोचिंग क्लासेसच्या संचालकांनी फायर ऑडिट प्रक्रियेसंदर्भातील विविध शंका उपस्थित केल्या.

त्यावर महापालिका व अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आवश्यक कागदपत्रे, परवानग्या आणि सुरक्षा मानकांबाबतही माहिती देण्यात आली. बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहायक संचालक नगररचना अधिकारी सागर वानखडे, मुख्य अग्निशमन अधिकारी दिनेश हंबर्डे, सहायक आयुक्त भूषण पुसतकर, मंगेश कडू, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, बाजार परवाना विभागाचे उदय चव्हाण तसेच अमरावती शहरातील विविध कोचिंग क्लासेसचे संचालक उपस्थित होते.

### ...अन्यथा होणार कारवाई

आयुक्त वर्षा लड्ढा यांनी सर्व संस्थांनी विहीत मुदतीत फायर ऑडिट पूर्ण करून त्याचा अहवाल महापालिकेकडे सादर करावा, असे निर्देश दिले. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर लागू असलेल्या कायदेशीर तरतुदीनुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये चार वर्षांच्या बालीकेवर यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

## सार्वजनिक आरोग्य विभागातील पाचवी यशस्वी शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

: विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी ) रुग्णालयामध्ये साडेचार वर्षांच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील पाचवी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत. सदर रुग्ण ही साडेचार वर्षांवरील असल्याने कुठल्याही योजने मध्ये बसत नसल्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधी ची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत केलेली आहे व शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी मध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पुढील एक वर्ष स्पीच थेरपी विनामूल्य करण्यात येणार आहे. या योजनेतून रुग्णाला दोन्ही योजनांच्या माध्यमातून शस्त्रक्रिया व स्पीच थेरपी याचा लाभ विनामूल्य मिळणार आहे.सदर रुग्ण ही रा. रासेगाव ता. अचलपूर जि. अमरावती येथील रहिवाशी असून



जन्मतः ती ऐकण्यास अक्षम होती. रुग्ण दोन वर्षाची झाल्यानंतर तिच्या कुटुंबियांना समजले की ती ऐकू शकत नाही . सुरुवातीला रुग्ण खाजगी रुग्णालयात उपचारासाठी गेले असता मात्र शस्त्रक्रियेचा खर्च जास्त असल्यामुळे रुग्णा सह नातेवाईक जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे आणले असता रुग्णालयात तपासणी केल्यानंतर रुग्णास सूपर स्पेशालिटी हॉस्पिटलला शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. सूपर स्पेशालिटी रुग्णालयात रुग्णाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व रुग्णास ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण मोरे यांच्याकडे तपासणीसाठी पाठवण्यात आले व तदनंतर शेवटी दिनांक २५ जुन २०२६ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मधे पारंपारिक तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.सदर जटिल शस्त्रक्रिया रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ .अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथील कान–नाक–घसा विभागप्रमुख डॉ. जीवन वेदी , नाक–कान– घसा तज्ञ डॉ. क्षितिज पाटील, डॉ रितेश शेलकर व सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल चे तसेच विशेष कार्य अधिकारी इ.एन.टी सर्जन डॉ. मंगेश मेंढे ,ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, बालरोग तज्ञ डॉ नितीन बर्डिया , बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. अश्विनी मडावी, न्यूरो फिजिशियन डॉ.अनिता अंभोरे,रेडिओलॉजिस्ट डॉ. शशांक दूरशेट्टीवार, यांच्या मार्फत करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मधे वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला मोहोड, समाजसेवा अधीक्षक शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यांनी मुंदाने, अधिसेविका चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार न्यूरो इंचार्ज सिस्टर दिपाली देशमुख, अलका मोहोड ,वैशाली नागराळे, मनीषा रामटेके, दीपिका वाटोडकर,विजय गवई, यश गवई, शुभम गवई, राहुल वायझाडे, शितल सानप, सुचिता खराते, लीना ठाकरे, ज्योत्स्ना खोब्रागडे, आदिती तिथे, स्नेहा राठोड, संगम उमरे, नीलिमा तायडे, पुष्पा तायडे, शुभांगी टीगणे, प्रतीक्षा भगत, स्वाती घवले, ज्योत्स्ना कांबळे, मनीषा कान्हेरकर, सिद्धार्थ उगले ,फार्मासिस्ट योगेश वाडेकर, बायोमेडिकल इंजिनिअर अमोल वाडेकर, प्रशांत शिरे , आकाश काळे, वेदांत इंदुरकर, ज्ञानेश लांजेवर, राहुल कवनपुरे , नंदनलाल राठोड,यांचे शस्त्रक्रियेत विशेष सहकार्य होते.

# मुलांचे शिक्षण पूर्ण कसे करायचे?

## ग्रामीण पालकांसमोर प्रश्न; शिक्षण अर्धवट सोडून शेतीकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती**

ग्रामीण भागातील अनेक पालकांसमोर आज 'मुलांचे शिक्षण पूर्ण कसे करायचे?' हा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. वाढती महागाई, शेती व्यवसायातील अनिश्चितता, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि शैक्षणिक खर्चात झालेली वाढ यामुळे पालकांना मुलांच्या शिक्षणासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. मात्र, निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पन्नात सातत्य नसते. अशा परिस्थितीत शालेय शुल्क, वह्या–पुस्तके, गणवेश, प्रवास खर्च आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी लागणारा खर्च भागविणे अनेक कुटुंबांसाठी अवघड बनले आहे. विशेषत:उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणासाठी



विद्यार्थ्यांना तालुका किंवा जिल्हा मुख्यालयी जावे लागते. यासाठी वसतिगृह, प्रवास आणि इतर खर्च वाढत असल्याने अनेक पालक आर्थिक अडचणीत सापडतात. काही ठिकाणी मुलांना शिक्षण अर्धवट सोडून रोजगार किंवा शेतीकामाकडे वळावे लागत असल्याची चिंताजनक स्थिती आहे. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश आणि इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यांची माहिती सर्व पालकांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी या योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. शिक्षण विभागाने आणि स्थानिक प्रशासनाने अशा योजनांची माहिती गावागावांत पोहोचविण्याची गरज व्यक्त होत आहे. शिक्षण तज्ज्ञांच्या मते, पालकांनी मुलांच्या शिक्षणाकडे खर्च म्हणून नव्हे तर भविष्यातील गुंतवणूक म्हणून पाहणे आवश्यक आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समित्या, ग्रामपंचायत, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींनीही गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण पूर्ण करणे ही केवळ पालकांचीच नव्हे तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याची संधी मिळू शकते, अशी भावना शिक्षणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

# अचलपूर जिल्ह्यात दर्यापूरचा समावेश नको

## दर्यापूरकरांचा तीव्र विरोध, सर्वपक्षीय बैठकीची तयारी

विदर्भ प्रजासत्ताकदि.३०दर्यापूर २७अचलपूरला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याच्या चर्चांना वेग आला असतानाच दर्यापूर तालुक्याचा प्रस्तावित अचलपूर जिल्ह्यात समावेश करण्यास दर्यापूरमधून तीव्र विरोध सुरू झाला आहे. दर्यापूर तालुका हा अमरावती जिल्ह्यातच कायम ठेवावा, अशी ठाम भूमिका स्थानिक नागरिकांसह विविध राजकीय नेत्यांनी मांडली आहे.दर्यापूर तालुका भाजप अल्पसंख्याक आघाडीचे नेते सलीमभाई घाणीवाले यांनी याबाबत निषेध व्यक्त करत, अचलपूर जिल्हा झाला तर त्याचे स्वागतच आहे; मात्र त्यामध्ये दर्यापूर तालुक्याचा समावेश करू नये, अशी मागणी केली आहे. अमरावती जिल्ह्याच्या विकासात दर्यापूर तालुक्याचे



महत्त्वपूर्ण योगदान असून, तालुका अमरावती जिल्ह्यातच राहणे जनतेच्या हिताचे असल्याचे त्यांनी सांगितले.या मागणीला अधिक बळ देण्यासाठी लवकरच दर्यापूर तालुक्यात सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही सलीमभाई घाणीवाले यांनी दिली. या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा आणि शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या निवेदनाबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अचलपूर जिल्हा निर्मितीच्या चर्चेदरम्यान दर्यापूर तालुक्याच्या समावेशाचा मुद्दा आता राजकीय आणि सामाजिक स्तरावर चर्चेचा विषय बनला असून, येत्या काळात या प्रश्नावर जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'एसआयआर'करिता आजपासून बीएलओंच्या गृहभेटी

## विशेष मतदार पुनरिक्षण मोहिमेला प्रारंभघरोघरी जाऊन भरले जाणार मतदारांचे अर्ज

### २९ जुलैपर्यंत सुरू राहणार मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती–**

आगामी निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेला मंगळवारपासून सुरुवात होत असून, मतदारयादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी बूथस्तरीय अधिकारी घराघरांत जाऊन मतदारांची माहिती संकलित करणार आहेत. या मोहिमेसाठी २० जून ते २९ जून या कालावधीत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.मंगळवारपासून सुरू होणारी ही मोहीम ३० जून ते २९ जुलै या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या काळात बीएलओ प्रत्येक मतदारांच्या घरी भेट देऊन आवश्यक अर्ज भरून घेणार असून, मतदारांची माहिती पडताळून पाहणार आहेत. ज्या मतदारांचे यापूर्वी मॅपिंग झाले नाही. अशा मतदारांना स्वतः आवश्यक कागदपत्रांसह पुरावे सादर करावे लागणार आहेत. परंतु, ज्यांचे मॅपिंग पूर्ण झाले त्यांच्याकडून मात्र केवळ अर्ज भरून घेतले जाणार आहे. या प्रक्रियेनंतर ५ ऑगस्टला प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यावर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत आक्षेप व हरकती स्वीकारल्या जाणार आहे. या विशेष पुनरिक्षण मोहिमेमुळे मतदार यादीतील त्रुटी दूर होण्यास मदत होणार आहे.